bluebytes
news that matters

**Friday, November 06, 2009**

**Pictorial warnings on tobacco products ineffective!**

Publication: Saamana, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 9, Location: Middle-Right, Width(cms): 8, Height(cms): 24, Size(sq.cms): 192

# तंबाखूच्या पाऊचवरील धोक्याचा विंचू परिणामकारक नाही

*परळ, दि. ५* - तंबाखू उत्पादने आणि सिगारेटच्या पाकिटांवर धोक्याची सूचना म्हणून छापलेला विंचू परिणामकारक नाही. धूम्रपान करणाऱ्यांनी आपल्या या घातक सवयीपासून दूर जावे, असा उद्देश या चित्र इशाऱ्यामागे होता, पण तो निष्फळ ठरला आहे, असे हेलीस सेखसरा इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थने केलेल्या सर्वेक्षणात उघडकीस आले आहे.




तंबाखू उत्पादनाच्या सर्वच पाकिटांवर तंबाखू ही आरोग्यास घातक असल्याचा इशारा छापला जातो. परंतु तंबाखूचे दुष्परिणाम प्रकर्षाने जाणवले जावे यासाठी धोक्याच्या इशाऱ्याबरोबर तंबाखू उत्पादनांवर विंचूचे चित्र छापले जाते. हा बदल करूनही अपेक्षित परिणाम जाणवलेला नाही. या बदलामुळे सिगारेट ओढणाऱ्यांची आणि तंबाखू चघळणाऱ्यांची संख्या कमी झाली नसल्याचे या संस्थेच्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे.

या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी हेलिसच्या वतीने तीन चाचण्या घेण्यात आल्या. कर्करोग हा अत्यंत घातक विकार आहे. फुप्फुस, घसा आणि तोंडाच्या कर्करोगाचे कारण फक्त तंबाखू आहे. धूम्रपान करणाऱ्यांना धूम्रपानापासून परावृत्त करण्यासाठी जनजागृतीची व्यापक मोहीम हाती घेतली जाणे आवश्यक आहे, असे हेलिसचे संचालक पी. सी. गुप्ता यांनी सांगितले.

## धोक्याच्या इशाऱ्यासाठी फक्त दहा टक्के जागा

तंबाखूची पुडी आणि सिगारेटच्या पाकिटावर धोक्याच्या इशाऱ्यासाठी फक्त दहा टक्केच जागा वापरली जाते. त्यामुळे तो चटकन नजरेत भरत नाही. या धोक्याच्या इशाऱ्यासाठी सर्व कंपन्यांनी आपल्या पाकिटावर जवळपास ४० टक्के जागा ठेवावी आणि त्यासाठी सर्वच स्तरातून जोरदार मागणी करण्यात यावी, असे मत या हेलिसचे संचालक पी. सी. गुप्ता यांनी व्यक्त केले आहे.

## प्रादेशिक भाषांचा उपयोग करावा

तंबाखूच्या पाऊचवरील इशारा हा बहुतेक वेळा इंग्रजी भाषेतूनच असतो. जे सिगारेट ओढतात आणि तंबाखू चघळतात त्यांच्यापैकी सर्वांनाच इंग्रजी येते असे नाही. त्यामुळे हा इशारा प्रादेशिक भाषांमध्येच छापला जावा. सहज दृष्टीस पडेल अशा ठिकाणी तो असावा, असेही हेलिसने सुचविले आहे.